

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन


SD SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री प्रेमाबाई जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

***आमचे ध्येय:***
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*



## वाटचाल ध्येयपूर्तीकडे ...

### एसडी- सीड वार्षिक शिष्यवृत्ती सोहळा २०१८

वर्ष ७ | अंक २१ | सप्टेंबर–डिसेंबर २०१८



# “समस्यांचे संधीत रूपांतर करा”



**जीवने यावदाऽदानं, स्यात प्रदानं ततोद्दिकम् ।**
**इत्येषा प्रर्थनाऽस्माकं, भगवन् परिपूर्यताम् ।।**

ही ईश्वरचरणी केलेली प्रार्थना आहे. ईश्वराकडे असं पसाय मागितलं आहे की, ‘‘या जीवनात मला जे मिळाले आहे, त्यापेक्षा अधिक माझ्याकडून दिले जावे व हे ईश्वरा माझी ही प्रार्थना सफल संपूर्ण होवू दे.’’

आदरणीय सुरेशदादांनी ह्याच प्रकारची आकांक्षा त्यांच्या आईच्या शिकवणीतून मनात बाळगली आणि एसडी–सीडचा जन्म झाला. अशी अनेक हुशार, होतकरू मुलं, मुली आहेत की जी आर्थिक दारिद्र्यामुळे शिक्षणापासून वंचित राहतात. त्यांच्यात क्षमता असूनही त्यांना संधी मिळू शकत नाही. अशांना मदतीचा हात दातृत्वाच्या मनस्वी भावनेने आणि निरपेक्ष वृत्तीने सुरेशदादा गेल्या अनेक वर्षांपासून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून देत आहेत. ही मदत मिळालेले युवक दादांच्या प्रति आयुष्यभर उपकृत राहतीलच. आणि तेही दादांची अपेक्षा नसताना. समाजाने देखील याची योग्य नोंद घेवून दादांचे अभिनंदन करून न थांबता या दानयज्ञात विविध स्वरूपाच्या शक्य असलेल्या समिधा टाकल्या पाहिजेत.

**यानिमित्ताने एसडी–सीड शिष्यवृत्ती लाभार्थ्यांसाठी काही सांगावेसे वाटते.**

आयुष्याचा प्रवाह कठीण आणि खडतर असतो. एक प्रकारे ही अडथळ्यांची शर्यत तर असतेच, पण त्याच बरोबरीने पदोपदी कठीण परीक्षांना सामोरे जावे लागते. एक प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत दुसरा उभा राहतो. शिष्यवृत्तीसारखी आर्थिक मदत मिळाल्याने हे प्रश्नांचे ओझे हलके होते, पण प्रश्न समूळ संपत नाही. प्रत्येक टप्प्यावर नवीन आव्हाने उभी ठाकतात. अशा वेळी मन दोलायमान होते आणि काही वेळा खचते देखील. आणि मग अनेक शक्य असलेल्या गोष्टी सोप्या असल्या तरी अशक्य वाटायला लागतात. अशा अशक्य वाटणा–या बाबींची यादी जर वाढत गेली तर नैराश्य येवू शकते. परंतु असा नकारात्मक प्रवास जाणीवपूर्वक प्रयत्नांनी रोखला पाहिजे एवढेच नव्हे तर टाळला पाहिजे.

अशा वेळी आवश्यकता आहे ती सकारात्मक विचारांची आणि धैर्याची, जिद्दीची. स्वामी विवेकानंद असे म्हणत असत की, ‘‘वाघ तुमच्या पाठी लागला तर पळायचे नसते, त्याऐवजी तोंड फिरवून धैर्याने आणि आत्मविश्वासाने वाघासमोर उभे ठाकायचे असते. त्याच्या नजरेत नजर भिडवायची असते. असे केल्यास तो पाठ फिरवून पळू लागेल.’’ याचा अर्थ स्पष्ट आहे. प्रश्न, अडचणी, समस्या, अडथळे वाघाप्रमाणे पाठीशी लागले तर धैर्य, आत्मविश्वास आणि जिद्दीने त्यांच्यासमोर उभे रहा. आपोआप समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचत जातील.

नेपोलियन बोनापार्ट याने उद्गारलेले प्रसिद्ध वाक्य आहे. “Impossible is the word in the dictionary of fools.” म्हणजे ‘‘अशक्य हा मुर्खांच्या शब्दकोशातील शब्द होय.’’ एसडी–सीड शिष्यवृत्ती प्राप्त करणारे युवक, युवती हुशार आहेत, जिद्दी आहेत आणि आत्मविश्वासाने संपन्न आहेत. त्यामुळे त्यांच्या शब्दकोशात ‘अशक्य’ हा शब्द नसणारच. जगात कोणतीही समस्या अशी नाही की ज्यावर उपाययोजना नाही. आपल्याला स्वत:च्या मनन–चिंतनातून आणि त्यास पूरक मार्गदर्शनातून आपल्या प्रश्नांचे निराकरण करणा–या उपायांची योजना करायची असते. यासाठी सकारात्मक दृष्टीकोन नितांत आवश्यक आहे.

‘‘नोच्चार्थो विफलोपी दूषणपदं, दुष्यस्तु कामोऽलघु:’’

याचाच अर्थ असा की, विफल होणे, अपयश नशिबी येणे हे दूषण नाही तर उद्दिष्ट छोटे ठेवणे मात्र निश्चितच दूषण आहे.

“Not failure, but low aim is a crime.” उद्दिष्टं छोटे ठेवणे हा गुन्हा आहे, परंतु मोठे उद्दिष्टं ठेवून प्रयत्न केल्यानंतरही जर अपयश आले तर तो गुन्हा ठरत नाही. किंबहुना अपयश हीच उत्तुंग यशाची पहिली पायरी असते. म्हणून सर्व युवकांना माझे आवाहन आहे की, आयुष्यासाठी मोठे उद्दिष्ट ठेवा, प्रयत्नांची पराकाष्ठा करा, अपयश आले तरी क्षणिक असते. त्यामागील कारणे शोधा, समस्यांचे आकलन करा आणि याच समस्यांचे संधीत रूपांतरीत करा. यश तुम्हाला प्राप्त होईलच. या विश्वात अनादी कालापासून अशी अनेक उदाहरणे सापडतील की ज्यांनी अत्यंत विपरित परिस्थितीतही असे काही साध्य केले आहे आणि जगाच्या इतिहासात चिरकाल अबाधित राहील असे स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. डॉ. ए.पी.जे. कलाम असोत किंवा स्टीफन हॉकिन्स आणि डॉ. रघुनाथ माशेलकर असोत. ही आणि अशी सगळी उदाहरणे तुम्हासाठी प्रेरणादायीच ठरतील. आता गरज आहे, ती अशा आदरणीय व्यक्तींची चरित्रे वाचण्याची आणि त्यावर विचार करण्याची. या प्रक्रियेत अनेक वेळा असे जाणवेल की या महनीय व्यक्तींच्या आयुष्यातील अडचणींची यादी आणि समस्यांचे विदारक स्वरूप, आपल्या अडचणी व समस्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त होते. आणि मग जाणीव होईल की आपण सहजपणे आपल्या प्रश्नांवर मात करण्यासाठी सिद्ध होणार आहोत. प्रवाहाच्या विरोधात अधिक ताकदीने पोहायला सुरूवात करणार आहोत. एकदा का विचारांची ही दिशा ठरली की मग आपले यान गगनमंडळ भेदायला उडालेच समजा!

यशाच्या सोपानावरून उंच शिखरावर चढण्यासाठी आतुर असलेल्या सर्व मित्रांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**– श्री. अनिल राव**
**एसडी–सीड सल्लागार समिती सदस्य**

या अंकात... पृष्ठ क्र.

| | |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. शिष्यवृत्ती वितरण सोहळा–२०१८ | ३ |
| ३. सोहळ्यातील निवडक क्षणचित्रे | ४ |
| ४. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ५ |
| ५. ‘नीट’ परीक्षेसंबंधी मार्गदर्शन | ६ |
| ६. गुरूंची शिकवण | ७ |
| ७. लाभार्थ्यांचे मनोगत | ८ |

ज्ञानयज्ञ संपादक मंडळ
श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

## "स्वतःची क्षमता ओळखून सर्वोत्तमतेचा ध्यास घ्या"

### शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथींचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील एसडी–सीडतर्फे जळगाव जिल्ह्यातील गरजवंत व गुणवंत विद्यार्थ्यांना प्राप्त होणारा शिष्यवृत्ती वितरण सोहळा जळगावी मोठ्या थाटात पार पडला. अनेक मान्यवर, विद्यार्थी व पालक यांचा या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मागील अकरा वर्षांपासून यशस्वीरित्या सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत १३,०००हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. त्यातील ३१०० विद्यार्थ्यांनी त्यांचे उच्चशिक्षण पूर्ण करून त्यांच्या व्यावसायिक करिअरमध्ये यशस्वी आहेत. त्यापैकी बरेच विद्यार्थी सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत.

**श्री. हणमंतरावजी गायकवाड**, भारत विकास ग्रुपचे संस्थापक आणि **श्री. विजयजी दर्डा**, लोकमत समूहाचे अध्यक्ष यांची या सोहळ्याला प्रमुख वक्ते म्हणून उपस्थिती लाभली. शिष्यवृत्ती वितरण सोहळयात निवड झालेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी काही निवडक लाभार्थ्यांना त्यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्त्यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना मागदर्शनपर केलेल्या भाषणातील काही मुद्दे खाली नमूद केले आहेत.

### प्रमुख वक्त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर केलेल्या भाषणाचे निवडक मुद्दे



#### श्री. हणमंतरावजी गायकवाड

- विद्यार्थ्यांनी कुठलंही काम समाधानीपणे आणि माझं म्हणून करा.
- गुणवत्तेत कुठलीही तडजोड न करता प्रत्येक गोष्टीचं निरीक्षण करून त्याची मुलभूत माहिती जाणून घ्या.
- जगात संधी प्रचंड असून, असे काही करा त्यातून समाजहित, देशहित घडण्यासह तुमचे आयुष्य घडेल.
- दररोज काही नवीन शिकण्याचा प्रयत्न करा. जगाच्या पाठीवर कुठेही काम करण्याची तयारी ठेवा.
- आपली क्षमता ओळखून करिअर निवडा. कामाची लाज बाळगू नका. आपल्या कामाशी प्रामाणिक रहा.
- आजच्या जगात नुसते चांगले असून भागत नाही, त्यासाठी कायम सर्वोत्तमच असले पाहिजे.

#### श्री. विजयजी दर्डा




- गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात येते.
- शिक्षण हे एकच असे माध्यम आहे की ज्याने सुसंस्कृत देश घडू शकतो तसेच संपूर्ण जग बदलू शकते. आणि याच माध्यमातून पुढे सुंदर भारतासाठी सुंदर विधाता घडू शकतो.
- आताच्या तंत्रज्ञानाच्या युगात अत्याधुनिक शिक्षण मिळणे गरजेचे आहे. देशात आजही पारंपरिक पद्धतीचे शिक्षण दिले जात असून ही शिक्षणपद्धती बदलविण्याची आवश्यकता आहे.
- आपल्या देशाची ओळख ही तिच्या संस्कृतीवरून होत असते. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले असून या संस्कृतीचा सर्व देशात सन्मान केला जातो. ही संस्कृती टिकवण्यासाठी व देशाचा विकास करण्यासाठी मुलांसह मुलींना देखील शिकवले पाहिजे.

## एक दृष्टीक्षेप...

### दीप प्रज्वलन, प्रमुख अतिथींचे भाषण व उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व पालकवर्ग







### प्रमुख अतिथींच्या हस्ते लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप




### प्रमुख अतिथी, एसडी–सीड सदस्य व इतर मान्यवरांसोबत शिष्यवृत्ती लाभार्थी



मागील चार महिन्यात एसडी–सीडने विद्यार्थ्यांमधील सुप्त कौशल्यांचा विकास होण्यासाठी तसेच शिक्षक आणि पालकांसाठीसुध्दा योग्य ते समुपदेश व्हावे या उद्देशाने शिक्षण प्रणालीमधील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तिन्ही घटकांवर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करून शिक्षणाचा दर्जा वाढावा यासाठी एकूण १८ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्यात १७३० विद्यार्थ्यांनी, ३५ शिक्षकांनी आणि ९० पालकांनी प्रशिक्षणांचा लाभ घेतला.

**'स्मार्ट गर्ल' — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** १. श्री. रत्नाकर महाजन
**ठिकाण:** १. ला.ना. सार्वजनिक विद्यालय, जळगाव
२. बी.यु.एन. रायसोनी मराठी विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण १२० विद्यार्थीनींचा सहभाग

**करिअर मार्गदर्शन — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** श्री. प्रवीण सोनवणे, एसडी–सीड असोसिएट
**ठिकाण:** १. या. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, जळगाव
२. इकरा शाहीन ज्युनिअर कॉलेज, जळगाव
**उपस्थिती:** एकूण २७० विद्यार्थ्यांचा सहभाग

**वेळेचे नियोजन**
**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे
**ठिकाण:** श्री संत मुक्ताबाई इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, जळगाव
**उपस्थिती:** एकूण १३० विद्यार्थ्यांचा सहभाग

**सीईटी परीक्षेची तयारी**
**मार्गदर्शक:** प्रा. एस.व्ही. सोमवंशी
**ठिकाण:** इकरा शाहीन ज्युनिअर कॉलेज, जळगाव
**उपस्थिती:** एकूण ८० विद्यार्थ्यांचा सहभाग

**स्मृती आणि एकाग्रता विकास — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे
**ठिकाण:** महाराणा प्रताप माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण २६० विद्यार्थ्यांचा सहभाग

**मुलाखत कौशल्य — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे
**ठिकाण:** १.एच.जे. थिम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव
२. पी.ई. तात्या पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, जळगाव
**उपस्थिती:** एकूण ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**वैयक्तिक समुपदेशन — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** प्रा. नंदलाल गादिया
**ठिकाण:** एसडी–सीड कार्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण ३० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पब्लिक स्पिकींग — (दोन कार्यक्रम)**
**मार्गदर्शक:** प्रा. नंदलाल गादिया
**ठिकाण:** १. नंदिनीबाई वामनराव ज्युनिअर कॉलेज, जळगाव
२. नॉर्थ महाराष्ट्र नॉलेज सिटी, कॉलेज ऑफ इंजिनीअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, जळगाव
**उपस्थिती:** एकूण १९० विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रेरणादायी व्याख्यान**
**मार्गदर्शक:** प्रा. नंदलाल गादिया
**ठिकाण:** डीएनसी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण १९० विद्यार्थ्यांचा सहभाग

**कौशल्य विकास**
**मार्गदर्शक:** प्रा. सुरेश पांडे
**ठिकाण:** अरूणामाई कॉलेज ऑफ फार्मसी, ममुराबाद
**उपस्थिती:** एकूण १६० विद्यार्थ्यांचा सहभाग

**शिक्षक प्रशिक्षण**
**मार्गदर्शक:** डॉ. किसन पाटील
**ठिकाण:** या.दे. पाटील माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण ३५ शिक्षकांचा सहभाग

**पालकांचे प्रबोधन**
**मार्गदर्शक:** श्री. महेश गोरडे
**ठिकाण:** महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगाव
**उपस्थिती:** एकूण ९० पालकांचा सहभाग


स्मार्ट गर्ल



सीईटी परीक्षेची तयारी


मुलाखत कौशल्य



वैयक्तिक समुपदेशन


पालकांचे प्रबोधन

# 'नीट' परिक्षा देताना




नॅशनल एलिजिबिलिटी कम एंट्रन्स टेस्ट – नीट – ही राष्ट्रीय पातळीवरील वैद्यकीय प्रवेश परीक्षा आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ही परीक्षा गरजेची आहे. परंतु फारच कमी विद्यार्थ्यांना या परीक्षेबद्दल नीटशी माहिती असते. त्यासाठी परीक्षेची मांडणी, अभ्यासाचे तंत्र अशा अनेक मुद्दयांवर प्रकाश टाकणारा हा लेख...

## 'नीट' किती सोपी आहे

दहावीत मिळालेले गुण हे केवळ चांगल्या महाविद्यालयात प्रवेश करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. दहावीचा अभ्यासक्रम अत्यंत कमी असून पाठांतर करून लिहिल्यानंतर ९५ टक्क्यांपर्यंत सहज मार्क मिळू शकतात. त्यामुळे या गुणांवरून मुलांची बौद्धिक क्षमता योग्य ठरणार नाही. पाठ करणे आणि समजून घेणे यामध्ये फरक आहे. सीईटीमध्येही पाठांतर करून लिहिणे शक्य होते मात्र 'नीट'मध्ये संकल्पना समजण्याला फार महत्त्व आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ही संकल्पना जर समजून घेतली तर ही परीक्षा त्यांना फारच सोपी जाईल.

## 'नीट' परीक्षेसाठी पात्रता

- विद्यार्थी भारताचा नागरिक असावा.
- १०+२ परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि इंग्रजी विषयातून उत्तीर्ण असावा.
- **गुणांची मर्यादा**
  - खुल्या वर्गासाठी बारावीत किमान ५० टक्के
  - दिव्यांग विद्यार्थ्यास ४५ टक्के
  - एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गतील विद्यार्थ्यास किमान ४० टक्के

## प्रवेश पद्धती

या परीक्षेच्या आधारे वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस, बीडीएस व्यतिरिक्त आयुर्वेद, होमियोपॅथी, पॅरा मेडिकल तसेच नर्सिंग इत्यादींचे प्रवेश पूर्णपणे 'नीट'वर अवलंबून आहेत. प्रत्येक कॉलेजमध्ये ८५ टक्के विद्यार्थी त्याच राज्यातील असतील तर १५ टक्के जागा इतर राज्यातील मुलांसाठी राखीव असतील.

## अभ्यास करा करायचा?

'नीट' ही वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी खूप महत्त्वाची स्पर्धात्मक परीक्षा आहे. या अभ्यासक्रमाची व्याप्ती खूप असल्यामुळे विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी सखोल तसेच नियोजनपूर्ण अभ्यास करणे खूपच गरजेचे आहे. या परीक्षेला विचारलेले प्रश्न हे ज्ञान, उपयोजन, कौशल्य व आकलन यावर आधारित असतात. या परीक्षेमध्ये गणितीय प्रश्न (Mathematical Base) कमी विचारले जातात. सर्वात प्रथम ११–१२वी चा अभ्यास बारकाईने करा. संकल्पना समजून घ्या. बारावीतही चांगले गुण मिळवायचे आहेत, हे लक्षात ठेवा. कारण अनेकजण सीईटी किंवा नीटमध्ये उत्तम गुण मिळवतात, पण बारावीला पीसीबीमध्ये ५० टक्केही गुण मिळत नाही. त्यामुळे वर्ष वाया जाण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सरासरी पीसीबीमध्ये ५० टक्के गुण मिळवावे. या परीक्षेचा अभ्यासक्रम ११–१२वी च्या (NCERT) पाठ्यपुस्तकारांवर आधारित आहे.

## प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

'नीट'मध्ये पीसीबी – फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायो – महत्त्वाचे आहे. प्रश्नपत्रिकेमध्य ४५ प्रश्न फिजिक्सचे, ४५ प्रश्न केमिस्ट्रीचे आणि ९० प्रश्न बायोचे असतात. असे एकूण १८० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाला चार गुण असतात. ७२० गुणांची ही संपूर्ण परीक्षा असते. या तीनही विषयांमध्ये एल१, एल२ आणि एल३ या स्तरावरील प्रश्न असतात. कठीण, मध्यम आणि काहीसे सोपे असे त्यांचे प्रमाण असते. त्यामुळे 'नीट'चे सगळेच प्रश्न कठीण नसतात. त्यांचे कठीण आणि सोप्याचे प्रमाण साधारण ठरलेले असते. १८० प्रश्नांपैकी जवळपास ६० सोपे, ६० मध्यम आणि ६० कठीण प्रश्न असतात. प्रश्न सोडवताना अचूक पर्याय निवडा. कारण 'नकारात्मक गुणपद्धती'मुळे गुण कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अचूक उत्तर सोडविण्याचा प्रयत्न करावा. परीक्षा कालावधी ३ तासांचा असल्यामुळे मर्यादित वेळेचे भान ठेवून विचारपूर्वक प्रश्न सोडवावेत. सर्व प्रश्न हे Multiple Choices अशा स्वरूपाचे असतात. प्रश्नपत्रिका सामान्य विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून तयार केली जाते. त्यामुळे कुणीच घाबरून जावू नये.

## कोणती पुस्तके वाचावीत?

या परीक्षेचा अभ्यासक्रम ११–१२वी च्या पाठ्यपुस्तकांवर आधारित आहे. त्यामुळे एनसीईआरटीच्या फिंगर टिप्स या पुस्तकातील सिनोप्सिस वाचा. त्यावर आधारित प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. केवळ आपण एखाद्या क्लासला जातो, त्यामुळे आपल्याला सर्व येईल, या भ्रमात राहू नका. स्वअभ्यासही अतिशय महत्त्वाचा आहे. एका मिनिटात एक प्रश्न सोडवायचा असल्याने प्रश्नाशी मैत्री करा. सतत सराव परीक्षा देवू नका. त्याऐवजी स्वअभ्यास आणि सरावावर भर द्या. नोव्हेंबरनंतर एक महिना विद्यार्थ्यांनी संपूर्णपणे बारावीच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करायला हवे. शेवटच्या टप्प्यातल्या तयारीसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्रासाठी खालील पुस्तके उपयोगी पडू शकतील.

1 NCERT ची ११ आणि १२वीची क्रमिक पुस्तके
2 Finger Tips for PCB
3 CBSE Paper Solutions

## प्रवेशासंबंधी

ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी www.cbseneet.nic.in या संकेतस्थळाचा उपयोग करायचा आहे.

विद्यार्थ्यांनी संपूर्ण अभ्यासक्रमाचा आढावा घेवून परीक्षेच्या तयारीची रणनीती आखावी. वेळेचे योग्य व्यवस्थापन केल्यास प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम अभ्यासणे विद्यार्थ्यांना नक्कीच शक्य होईल.

# सर्वकाही शक्य आहे

## प्रसिद्ध उद्योगपती **श्री. रतन टाटा** यांचे कॉलेजमधून उत्तीर्ण होवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक भाषण



आपण आपल्या सभोवतालच्या लोकांकडून नेहमी ऐकतो की, 'हे काम होवू शकत नाही' किंवा 'हे काम करणे शक्य नाही.' महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर अशा विधानांना पूर्णपणे खंडित करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. आपल्या देशात अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्या वास्तवात घडल्या पाहिजे होत्या, परंतु घडल्या नाही. आणि यामागे फक्त आणि फक्त अशा मानसिकतेचे लोकच जबाबदार आहेत, जे नेहमी वरील विधाने करीत असतात.

येणाऱ्या काळात तुम्ही या देशाचे नेतृत्व कराल. या देशाचे भविष्य तुमच्या खांद्यावर असेल. त्यामुळे 'हे काम करणे शक्य नाही' किंवा 'ते होणे शक्य नाही' अशा विचारांना मनात अजिबात थारा देवू नका. तुमच्या चारी बाजूंना नजर टाकून बघा, तुम्हाला दिसेल की संपूर्ण जग हे यशोगाथेने भरलेले आहे. बऱ्याच मोठ्या कंपन्यांची उदाहरणे आहेत. ह्या कंपन्या सुरू करण्याच्या कल्पना कुठून आल्यात याचा विचार करा. माइक्रोसॉफ्ट, गूगल, फेसबुक, ॲपल, ॲमेझॉन यांसारख्या मोठ्या कंपन्यांचा उदय कसा झाला आहे?ह्या कंपन्या तेव्हाच अस्तित्वात आल्या जेव्हा कोणाला तरी वाटले की 'हे काम नक्की होवू शकते आणि हे अगदी शक्य आहे.'

माझी तुमच्याकडून अशी अपेक्षा आहे की, नकारात्मकतेकडे तुम्ही कधीच लक्ष देवू नका. जर विचारात घेतले आणि मनाचा निर्धार केला तर मोठ्यातले मोठे काम देखील सहज शक्य होवू शकते. तसेच लक्षात ठेवा की जीवनात तुम्ही कितीही यशाच्या उत्तुंग स्थानी पोहचला तरी नम्रतेची कास कधीच सोडू नका. तुम्ही कधी एखाद्या नोबेल पारितोषिक विजेत्याला भेटला आहात का?ते आपणांस कदापि भासू देणार नाहीत की ते इतक्या मोठ्या पुरस्काराचे मानकरी आहेत. त्यांच्या सान्निध्यात असलेल्या लोकांवरूनच त्यांच्या महानतेविषयी तुम्हाला जाणीव होईल. तुम्ही जे शिक्षण प्राप्त केले आहे त्यानुसार समाजाप्रती आपण काही देणं लागतो त्या अनुषंगाने कार्य करीत राहा.

तुमच्या यशाचे मोजमाप कधीच तुम्ही किती पैसा कमावला, कोणत्या पदावर तुम्ही कार्यरत आहात किंवा समाजात तुमची किती प्रतिष्ठा आहे याच्या आधारे करू नका. तुमच्या यशाची मोजणी यात असावी की, जेव्हा तुम्ही रात्री घरी परतता तेव्हा तुमच्या मनात हे समाधान असले पाहिजे की तुम्ही समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी तुमचे योगदान दिले आहे, जरी ते योगदान अगदी छोट्या प्रमाणात असेल तरी चालेल.

### यशस्वी प्रतिमा तयार करा

तुम्हाला भेटल्यानंतर मी यामुळे थोडासा दु:खी झालो की आज मी तुमच्या वयाचा नाही आणि अशा वेळेस महाविद्यालयातून उत्तीर्ण होवून बाहेर पडत नाही जेव्हा बाहेरचे व्यावसायिक जग तुमच्या स्वागतासाठी सज्ज आहे. तुमच्यासाठी हा अतिशय महत्त्वाचा क्षण असेल, परंतु हेही खरे की यावेळी तुमची जबाबदारी देखील मोठी असेल.

येत्या काही वर्षात तुम्हाला नेतृत्वगुण सिद्ध करायचे आहे. महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर तुम्हा सर्वांना व्यावसायिक विश्वाची मोठी जबाबदारी पेलायची आहे आणि यासाठी तुमच्यातील सर्वोत्कृष्ट देण्याशिवाय तुमच्याकडे दुसरा पर्याय नाही. तुम्हाला सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल. मी ज्या नेतृत्वाबद्दल बोलत आहे, मला आशा आहे की तुम्ही हे पूर्ण करण्यासाठी तुमच्या तत्त्वांशी कधीही तडजोड करणार नाही आणि तुमच्या मूल्यांना पूर्ण महत्त्व द्याल.

मला विश्वास आहे की, खरा नेता तोच असतो ज्याच्याकडे ध्येय आहे, दूरदृष्टी आहे आणि भविष्यकाळात प्राप्त होणाऱ्या संधींची त्याला अगोदरच जाण असते आणि त्या दिशेनेच तो मार्गक्रमण करीत असतो. तसे मला खेद वाटतो की, अशा व्यावसायिक नेत्यांची आपल्या देशात कमतरता आहे. आमच्या अनेक व्यावसायिक नेत्यांनी जगातील नेत्यांचे अनुसरण केले आहे. परंतु तुम्हाला ही प्रथा मोडायची आहे आणि तुमची नवीन यशोगाथा लिहायची आहे. त्यासाठी तुमच्यामध्ये दृढनिश्चय, क्षमता आणि पूर्ण आत्मविश्वास असणे अत्यंत आवश्यक आहे.

याव्यतिरिक्त मी तुम्हाला हे देखील सांगू इच्छितो की, पैसा, पद, प्रतिष्ठा कमावण्याव्यतिरिक्त तुमची आणखी एक महत्वाची जबाबदारी सुद्धा आहे आणि ती तुम्हाला अगदी मनापासून पूर्ण करायची आहे. ती जबाबदारी म्हणजे एक माणूस म्हणून समाजातील तुमची भूमिका. तुम्हाला असे काही कार्य करायचे आहे, जे कोणतेही आणि कितीही लहान असो, परंतु ज्यामुळे या देशातील ग्रामीण भागात राहणाऱ्या करोडो लोकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल तसेच त्यामुळे त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडू शकेल. जर तुम्ही असे कार्य कराल तेव्हाच खऱ्या अर्थाने तुम्ही यशस्वी व्हाल.

(Source: www.indiatimes.com)

## आमची उद्दिष्टे

ज्ञानयज्ञ

- सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
- सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
- सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



### जैन अक्षय चंद्रकांत, भडगाव — BAMS (Third Year)

सर्वप्रथम मी एसडी–सीडचे मनापासून आभार मानतो कारण मागील तीन वर्षांपासून मला त्यांच्याकडून शिष्यवृत्ती प्राप्त होत आहे. मागील वर्षी वडीलांचे छत्र हरपले आणि आई अपंगावस्थेत आहे. दोन वर्षांपूर्वी मेडीकलला प्रवेश घेतला, परंतु पुढे काय करावे असा यक्षप्रश्न समोर होता. घरात कमावणारे कोणीच नाही आणि अशा दुर्दैवी परिस्थितीत माझे सध्याचे शिक्षण सुरू आहे ते फक्त एसडी–सीड शिष्यवृत्तीच्या मदतीनेच. यामुळे मला व माझ्या आईला मानसिक आधार मिळाला आहे आणि त्यासाठी मी मा. सुरेशदादा जैन यांचे पुनश्च: मनापासून आभार मानतो.

मा. दादांनी सुरू केलेल्या या उपक्रमामुळे जणू काही वडीलांचे छत्रच मला मिळाले आहे. ईश्वर दादांना दिर्घायुष्य देवो व माझ्यासारख्या हजारो गरजू विद्यार्थ्यांना त्यांची छत्रछाया अशीच लाभो, ही प्रार्थना करतो.



### नाईक जितेंद्र पदम, जामनेर — MA (Second Year)

मागील दोन वर्षांपासून मला एसडी–सीड शिष्यवृत्ती मिळत आहे आणि त्या मदतीने मी एम.ए. पत्रकारितेच्या द्वितीय वर्षात शिकत आहे. घरची परिस्थिती अतिशय बेताची. मी लहानपणापासूनच मोलमजुरी करून बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. वडील सतत आजारी आणि दुष्काळामुळे शेतात काही पिकत नाही. या परिस्थितीला कंटाळून नैराश्यामुळे भावाने देखील आत्महत्या केली. या घटनेमुळे माझा पुढील शैक्षणिक प्रवास सर्वत्र अंधारमय दिसत होता. परंतु अशा परिस्थितीत नरातला 'नारायण' व एक देव माणूस माझ्या मदतीला धावून आला. ते म्हणजे गरीबांचे कैवारी, दातृत्ववान मा. सुरेशदादा जैन. दादांनी माझ्या अंधारमय भविष्याला एक आशेचा किरण देवून मला शिक्षणाच्या प्रवाहात आणले. यामुळे मी दादांचे मनापासून आभार व्यक्त करतो.



### पाटील ललिता दिलीप, जळगाव — MCA (Third Year)

माझी घरची परिस्थिती फार सामान्य आहे. वडील शेतमजूर आहेत त्यामुळे माझा शैक्षणिक खर्च त्यांना पेलवणारा नाही. परंतु एसडी–सीडच्या शिष्यवृत्तीमुळे माझ्या उच्चशिक्षणात त्याचा खूप हातभार मिळत आहे. एसडी–सीड ही अशी एक संस्था आहे, ज्यामुळे सामान्य घरातील गुणवंतांना देखील त्यांच्या आशा–आकांक्षाविषयी विचार करण्यास प्रेरित करते. त्यामुळे मी दादांना सांगू इच्छिते की, तुमचा हा उपक्रम असाच चालू राहू देत आणि तुमच्यामुळे एका सामान्य घरातील दिव्यांनाही प्रकाशाची ज्योत दिसू देत.

दादा, तुम्ही असे सदैव आम्हा विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहा. मी सुद्धा भविष्यात नोकरीला लागल्यावर माझ्याकडून होईल ती मदत नक्की करेन.



### चौधरी भाग्यश्री लिलाधर, जळगाव — MCA (Third Year)

माझे वडील रिक्षा ड्रायव्हर आहेत आणि त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे आम्हाला अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातच माझे उच्च शिक्षण सुरू असल्यामुळे कॉलेजची फी भरणे, नवीन पुस्तके विकत घेणे यांसारख्या अनेक आर्थिक अडचणी तोंड वर काढतात. आणि अशा परिस्थितीत मला मागील सहा वर्षांपासून एसडी–सीड शिष्यवृत्ती मिळत आहे. त्यामुळे कॉलेजची फी भरणे मला शक्य झाले. शिष्यवृत्तीसोबतच एसडी–सीडमार्फत राबविले जाणारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम, व्याख्याने, कार्यशाळा यांच्या माध्यमातून माझ्यातील विविध कौशल्यांचा विकास होण्यासही मदत झाली. इंटरव्ह्युला सामारे कसे जावे, तयारी कशी करावी या गोष्टी समजल्या आणि आपणही सध्याच्या स्पर्धात्मक युगात टिकून राहू शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला.

मा. दादांनी सुरू केलेल्या आणि आमच्यासारख्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कार्यरत असलेल्या एसडी–सीडला मी शुभेच्छा देते. दादांनी हा उपक्रम असाच चालू ठेवावा आणि त्यांनी आमच्याप्रती पाहिलेले स्वप्न आम्ही पूर्ण करणार याची मी ग्वाही देते.

SD SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.
Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in